. ग्रं. सं. ठाणें
काव्य
२५०१



# खेळ

नामदेव ढसाळ

REFBK-0024145
REFBK-0024145

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०१
२२१.२५
काव्य ३।३।
ग्रंथ शाखा

# खेळ

प्रास २२ वा ❧ ❧ ❧ ❧ ❧ ❧ ❧ ❧ ❧ ❧

खेळ

© नामदेव ढसाळ

पहिली खेप ❧ नाताळ १९८३

मुखपृष्ठ ❧ बाळ ठाकूर
मांडणी ❧ अशोक शहाणे

मुद्रक ❧ सुरेश जगताप ❧ जनसेवा मुद्रणालय ❧
१९२ शुक्रवार ❧ पुणें ४११ ००२

प्रकाशक ❧ अशोक शहाणे ❧ प्रास प्रकाशन ❧
३९ नाथमाधव ❧ कांदिवली पूर्व ❧ मुंबई ४०० १०१

किंमत ❧ वीस रुपये

समस्त
स्त्री-पुरुषांच्या
कामविलासांना--

नामदेव ढसाळ यांच्या आणखी कविता

गोलपिठा
मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले
इंदिरा प्रियदर्शिनी
तुही इयत्ता कंची ?

संदर्भ काव्य
3/31

# खेळ

## नामदेव ढसाळ

प्रास



मराठी ग्रंथ संग्रहालय
२५०९
२०७२
काव्य ३|३
ग्रंथ शाखा (स्थळ

सावलीसारखे झोपलेले तुझे-माझे
दुःख निरागस
इथे या असतेपणात-नसतेपणात
फेडून टाक तुझ्या आत्म्याची सर्वच वस्त्रे
शोध आत्म्यातल्याही आत्म्यातला
तुझा नागडा देह
जो कधी माझ्यासारख्या भणंगाला
केला होतास बहाल
जे शाश्वत अशाश्वत होतं ते तूच देत आलीस
तुझ्या या गावंढळ ईश्वराबद्दल
मी कशाला मौन बाळगू
या सर्वच अभिचारानंतर
मी थोपवू शकतो ही निर्घृणता
थांबवू शकतो तुझ्या-माझ्या संस्कृतीची वाताहत
आजवर सर्वच धोके पत्करून खेळत आलो
तुझ्याशी सारंगपाणी
आता केवळ कवितेसाठी
जन्मभर पत्करणे दारिद्र्य आणि वनवास
आता फक्त हवी माथ्यावर
तुझ्या देहाची नागडी सावली
जिच्या हयातीत यापुढील
सुलक्षणी वळू उकरत राहतील जगदंब वारुळे

REFBK-0024145
REFBK-002414

एका रात्रीकडून दुसऱ्या रात्रीकडे
सरकणारे मैथुनाचे लटांवर
चिरंतनाच्या भिंतीपाशी मी उभा आहे
हे कुरूपातले स्वरूप
हे चिद्विलासातले पूर्णत्व
मला येतो आहे माझ्यातल्याच सांडपाण्याचा वास
देह आणि इच्छा
आभास आणि चुका
ह्या वनवासी एकांतात
मी शिकतो आहे रोजचेच मरण जगायला
मी माझ्यातल्याच पाकळ्या किती करू सैल ?
मी कसा ओळखू
माझ्यातला चिरंजीव गुलाम आणि जुलमी सैतान ?
हा रात्रीच्या नाभीत
बीजारोपित होत जाणारा विजेचा लोळ
हे दिङ्मूढ प्रकाशाचे संवत्सरवीर्य
मांजराचा होऊन जातोय मोर
ही तुझ्या-माझ्या समागमातली आदिम शिवशक्ती
हे पुरातन स्तनातून उसळणारे भवतृष्ण कारंजे
हे अवघे आकाश तुझ्या-माझ्यातल्या मतलबातले
ज्याला आदि नाही
ज्याला अंत नाही
मी साद घालतोय तुला युगानुयुगे
तू थोडीशी हंवरशील ना ?

सत्य अस्तं रानडुकरासारखं धसमुसळं
आरश्यात पाहून त्याला थोडीच खेळवतात
सोन्याचं पाणी चढवावं वस्तूवर
तस्सं थोडंच करता येतं त्याच्या बाबतीत
मनात नांदतं इंद्रधनुष्य
स्वप्नसंकेतांना हे असं रंगाचं संमोहन

या तीव्रतेला कस्सं नाकारायचं
तुझ्या देहाची किरणं
मोडत रहातात शांततेचे दरवाजे
अर्धनटेश्वर होऊन चंद्र नाचू लागतो
टचकन उमलून येतं डोळ्यांत तरळ पाणी
ध्वनींचा वसंत घेऊन येतो सैंयवर
बासरीच्या स्वराला फुटते पालवी
जागच्या जागी प्रत्येक माणूस बनून जातो अनंगरंगाचा दगड
सातासमुद्रापलिकडचा युगेश्वर ढाळू लागतो चवऱ्या सुखासीनाच्या उदंड

तू पाहू शकतेस माझ्यापर्यंत
जिथे दळभद्रीपणाचे
हंगाम दुपावलेले
जिथे
ताकात डेंगण घालून
निर्वाण पावलेले वसंत
जिथे गुप्त अंत:स्थ जागा
तुझ्या-माझ्या संकेतभोगाची
जिथे
उधाणती रक्तधमनी
तुझ्या-माझ्या अंतराळातली
जिथे
अद्वैतापलिकडचा क्लच दाबून
आयुष्य गिअरमध्ये टाकलेले
जिथे
टचकन उमलणारे
सनातन कमळ
बेंबीच्या देठाआतले
जिथे
अमोघ संचारते वीर्य
नतद्रष्ट सूर्याला पराजित करणारे

जिथे गोजिरवाणी जागा
तुझ्या-माझ्या अहंकाराची
जिथे हुबेहूब नग्नांकित
सचैल तुझ्या-माझ्यातले
जिथे तीक्ष्ण धारेवरल्या
सरोवरातले खेळते राजहंसपाणी
तू पाहू शकतेस माझ्यापर्यंत
आरपार पृथक्
अलिकडे पलिकडे
जिथे उभे सुखसंगाचे जुळे कामातुर
तू खेळू शकतेस
अश्लीलतेचा जुना पारंपारिक खेळ
थेट नव्या नव्या आसनांचा
थेट नव्या नव्या जाणिवांचा
एक विलोभनीय मृद्गंध
झूमगौरी
एक नूतन दुःखाची
सचैल ओलेती

ही अशी अनावर
मौनमुद्रा वाढत जाते कलाकलान
हे असे तुझे चंद्रबळ सुनास आले
इंद्रियेही हाकारतात जिथे विषयांना
तिथे हा बाट कशाला ?
हा लिंगभेद विलोरी
हा व्याकुळतीचा घनमोर
मिळू दे वाव दृढालिंगनाला
पोसली जाऊ दे सुवेळ
डोळयांना फुटू देत आरसे
आरसे, दवंळते चाफेकळी

काय होतं स्वप्नांचं ते हरवल्यानंतर
ओस पडतात कोसच्या कोस
हिरमुसून जातो आपण
काय होतं स्वप्नांचं ते हरवल्यानंतर
सूर्याचा फॉस्फरस जातो संपून
उठून दिसत नाहीत चंद्राच्याही
चेहऱ्यावरले डाग
सरड्याला कुंपणापर्यंत धावता येतं
आपल्याला तेवढंही नाही
काय होतं स्वप्नांचं ते हरवल्यानंतर
संपून जातं जीवनसंगीत
आपण होऊन जातो भलतेच छोटे गरीब
आणि धुवाधार सरसुंदे

बाल्झाकची प्रामाणिकता कुणीच नाकारत नाहीत
पोरी, नको शोधू शिश्नमूळ
तुला जडलं आहे खूळ

जग तेच आहे
माणसंही तीच आहेत
दगडही तेच आहेत
श्रद्धाही त्याच आहेत
धुवून टाक हे नवोदित पाप
जमल्यास तुझ्या ईश्वराच्या रक्तानं

आपल्यातल्या अनाकलनीय भागावर सांडून टाक
उजेड
या उजेडात दिसून येवो तुला
उभ्या जन्माचं अश्लील

नावाच्या सत्तेत अडकायचं नाही मला
समज हे तादात्म्य
गवताच्या पाण्यातलं
अथवा वाळूच्या कणांतलं अथवा तुझ्या-माझ्या संभोगातलं
मी जिथे आहे तिथेच राहूं दे
नको हलवू माझ्या
पायाखालचा किंकर
आतले-बाहेरचं गडगंज विश्व
जिभेचं हालतं दार
मासा पोहतो दूरदूर जातो पाण्याला अंत नाही
पक्षी उडतो दूरदूर जातो आकाशाला अंत नाही
ही माझ्यातली अनोळखी पारदर्शकता
हा समुद्र धमन्यांतून वाहणारा
विस्मय आणि आनंद
आता कशाला पळू आयुष्यापासून दूर
हा ज्ञानाचा अंतिम दगड
अरे काळोख्या गुहेतील रहिवाश्या
आता नखल तुझ्यातलं अगाध विवर
सांडून टाक मन आणि शरीर
स्वर्गाची वस्त्रं ते नेसत नाहीत
ताऱ्यांचा मुकुट ते शिरावर चढवत नाहीत
जगाचे वारस ते होत नाहीत
आता तूच टाक उडी या प्रवाहात

फुलांना करू नका इजा
हा सततचा अग्निवर्षाव
प्रत्येक दिवसाचं धड किती करायचं स्वच्छ
आज उद्या परवा तेरवा
किती उधारीवर
शेजाऱ्यांच्या बागेत फिरून यायचं
लोअर स्टॉल्स
अप्पर स्टॉल्स
कुणी कुणाला यूज करायचं
काळ बसला आहे शांततेची पानं तोडत
मृत्यू चंद्र होऊन सांडला आहे पाण्यात
अस्तित्वाच्या फांदीला लटकलेलं आत्म्याचं माकड
दावतं आहे त्याला वाकुल्या
खरंच सांग
ही किमया तुझ्या नग्न देहाची तर नाही ना ?

एक लोणचं म्हणीचं
भाषेचं सफरचंद
झेंड्यासोबत त्याची कारणंदेखील
लागतात फडफडू
देशाची मान्यवर प्रतिमा
राष्ट्रध्वज आणि मैथुन
राष्ट्रपिता ओढतो आहे लाल धागा तोकडी बिडी
माकडछाप काळी टूथ पावडर लावून तोंड करतो आहे स्वच्छ
मी नीट करतो आहे बिघडलेला दुःखाचा
आकार
चमकत्या त्रिमित्यांची काचेरी फुलं ठेवतो आहे
रचून
अशी आंधळ्यांची शेटं ओलांडून
या दगडांना तरी काय मिळणार ?
या शुभसंदेशाच्या पार्श्वभूमीवर
सत्तेचा अल्सर
जनताजनार्दनाच्या बेंबीचं ब्रह्मकमळ
बेंबीवर टांगलेला जळता घोडा
त्याची प्रतिच्छाया तुला-मला गिळंकृत करणारी
स्टड फार्म
सरोवर
या सूर्योदयात कुठलं सत्य होऊ घातलं आहे अनाथ

माझ्या यादीत कुठलाच वार नाही काळा
माझ्या दिशेनं
अनवाणी पायांनी चालत येणारा रोदाँचा पुतळा
त्याच्या हातात कसल्या शकुनाची डहाळी
अशी ही प्रतिमेची शेतं कुणाच्या आज्ञेवरून
नांगरली जाताहेत
कुणाच्या हुकुमावरून केली जातेय दुःखाची काटछाट
आकाश, पृथ्वी यामधला मी झालो आहे दुवा
पाचूची हिर्वीगार लखलखीत ज्योत
रांगते आहे आपल्या सामूहिक अंगणात
एवढं घडून आल्यानंतर
तू कुठल्या कैद्यांविषयी बोलणार आहेस
तुझ्या चिमुकल्या खिडकीत
कशा होतील या कामेच्छा बंदिस्त
मी माझ्या भविष्यावर रात्रभर ठेवला आहे पहारा
एखाद्या सकाळी मी पृथ्वीचाच रंग बदलून टाकीन
या ऋणानुबंधातून प्रसवणारं बीजेचं लावण्य
हवं तर त्याला प्रेम म्हण
हवं तर त्याला सामर्थ्य म्हण
प्रेम :
आकाशाला तडा घालणारी शीळ
किंवा फुलांना गोंजारणारी धूळ
किंवा स्तनाग्रावर बसून चिवचिवणारी
निष्पाप, लावसट चिमणी

हे कुठल्या अनंगरंगातलं आसन ?
वस्त्रं फेडावीत तसा अंधार फेडून टाकलास तू
देहावर चांदणं माळून ही अल्पायुषी रात्र
कुणाच्या शोधात निघाली आहे ?
धुंद स्वरांनी लपेटून गेलेली जिंदगी
आणि हे जुगनू छोट्या छोट्या आठवणींचे
हा लुळापांगळा मुलगा
कुणाच्या जखमा धुतो आहे
हा अनौरस कुठला धर्म स्थापतो आहे
मेरीसारखी उदात्त रात्र
मृत्यूही देऊ शकत नाही तिला आव्हान
येशूच्या स्वप्नांसारखी
शुभ्र अवलख घोडीवरून वाहणारी ही हवा
पहाता पहाता शांत लाटांचं वादळांत रूपांतर
पहाता पहाता समुद्रमंथन
ही पहाडी धून कुठल्या दऱ्याखोऱ्यांना जागवणारी
प्रिये, सांडू नकोस ओठांतली बांसरी
या अतीताच्या प्रकाशात
नाचतो आहे मैथुनमोर
दुर्भाग्य गेलं आहे संपून इंद्रधनुष्याचं
या पतझडीनंतर
हे शहर परिधान करील पवित्र दृश्य

तू झाकून टाक तुझ्या दयाळूपणाचे पंख
भरपूर होऊन वाहणारी जखमांची नदी
या हेमंतात ही तटस्थता कशासाठी
वाऱ्या-वावधानाला हाकीत जाणारी
तुटलेल्या शब्दांच्या माना बघ डोळ्यांत
या अंधारावर कसलं भाष्य करतेस ?
मृत्यूपेक्षा श्रेष्ठ आहे प्रेम
जो मी एक होतो तुझ्याबरोबर
तुझ्या हृदयात मी शोधला नाही माझा अस्त
हिंस्रतेला असते वाढ
काहीतरी मागणी करणारे ओठ माझेच आहेत
राखेचं नशीब बदलून टाकणारं म्हण एखादं गाणं
हा गदारोळ मला काय देऊन जाणाराहे
काळ येथपर्यंत खेचत घेऊन आला आहे मला
किती कठिण आता परतणं
दिवसाचं कापड शिवते आहे रात्र
बिछान्याची हिरवी शेतं
काय घडणार आहे इथे
आपल्याच आज्ञा आपल्याला
चढवणार तर नाहीत ना फासावर ?

पावसाची दारं खुलतात
जशी भाषेची
अभेद्य उंची
काल रात्री तू म्हणाली होतीस
आपण दु:खाला आमंत्रण देऊ या
ही मुद्रा आपण कशावर उमटवून घ्यायची ?
दिवसांच्या पानांमधलं अस्तित्व
मी माझ्या लोचनांत
दु:खाचं लावण्य साठवतो
आणि पहातापहाता कोसळतो पाऊस होऊन
आता ही वेळ परतीची अलौकिक क्षणाची
हा माझा सर्वस्पर्शी प्राण
भ्रमण करत राहतो सूक्ष्म खोल्यांतूनही

कुणीतरी मदत करा
निश्चित ही जागा कालच्या आज्ञेतली
खाली हृदयाची घरंघर
आणि शांततेवर सांडलेलं बर्फ
तू माझ्या आत आहेस
शांतवन झोपलेली
दिवस तुला हाकारतोय
तू मान्य करशील का हे अस्सं येणं
जेव्हा तू डोळे उघडशील तेव्हा नग्न देहाची बरसात
सुरु झालेली असेल
अज्ञानाचा साक्षी सूर
गवसलेला

रात्रीचं फुफ्फुस करतं आहे धूम्रपान
राख आणि वारा ध्वनीशिवाय संचारतोय
चंद्र डोळ्यांपासून कसा तटस्थ राहील ?
शब्दांचे बेडूक डराव डराव करणारे
हा अग्निझोत
ही माझीच छाया मला डसणारी
झाडांशी सुसंवाद फुलांशी हितगुज
हे मुली, हा बगीचा तर मेलेला आहे
जीवाचा कान झाला तरी
आता कुठलाच पक्षी इथे गाणार नाही
घनव्याकुळ गाणं

चुंबन घ्यायचं होतं, घेतलंस
आता पुढे काय ?
ज्वालामुखीवर तू अस्सं कफन
पांघरायला नको होतंस
अतीव शुभ्र भरदार
मी चकित आश्चर्य
शहरावरून वाहणारी तारांगणं
त्यांना जखमी करून जाणारा माझा श्वास
यापेक्षा नाही
अजून जास्त काही
सूचनेशिवाय जळणारं आभाळ
च्यायला
धन्य तुझी, तरीही उभी
दोन पायांवर इमारत

आठवणींचा स्पर्श
मी धरूनच चाललो होतो तू येणार म्हणून
आज तुला काय द्यायचं ?
तसा मी थकलोयच
परंतु अचानक एक बाई वसंताबद्दल
बोलू लागली
तू या यातना कुणासाठी आणल्यायस ?
तुझ्यापेक्षा
मी त्यांच्यावर अधिक करायला लागलोय प्रेम
मी फक्त त्यांना जोजवू शकतो
तुला नाही

मी पाहिलंय त्याला
मी नाकारलंय त्याला कित्येकदा
अनेक गावं
भटकत रहाणारं माझं प्रेत
या संध्याप्रकाशात थांब आणि उभी रहा
एक बेवडा मारतो आहे परमेश्वराला फोन
एवढी खालच्या पातळीवरली दया नको
दाखवूस मला
संपलीच असेल नात्यातली शक्ती
सरळ हात झटकून मोकळं हो
म्हणजे
या पाण्यावर दोन घाव तरी घालता येतील तुला

वेळेला लाव ठिगळ
डोळ्यांखाली
श्वासांचं अस्वल
झोपलेला बर्फाचा सिंह
कर जागा
झटकून टाक भावनेवरली आयाळ
हवेची हिरवी लिंबं
आदळू देत अस्तित्वाच्या भिंतीवर
सशक्त जांभळा रंग होऊ दे सर्वसामान्य
आयुष्याला चढू दे धुंद

तुझा चेहरा दुभंग
डोळ्यांतला चक्रधर
फेडून टाक

या मॅग्नेटसारख्या हालचाली
तुझ्या मनात रुजो दुःख
जशी ढगातून विपरीत होणारी शक्ती

मराठी ग्रंथ संग्रह
2509
2291
काव्य ३
ग्रंथ शाखा (स्थ

या दैनिक पुस्तकातली खाडाखोड थांबव
मी ओळखतो ती जागा
जिथे सत्य उभं रहातं
या चंद्राला बरसू दे सुखानं
आळव एखादी लोरी
जिचा उपयोग होईल एखाद्या अपंगाच्या वाढीसाठी
तू तुझ्यातल्या सर्व चेहऱ्यांना पुकार
पुकार तुझ्यातल्या हसऱ्या बगिच्यांना
पुकार त्यातल्या चुकार फुलांना
जी कधी होती तुझ्यासाठी लडिवाळ

या आरशात न्याहाळून घे
आपलाच विद्रूप चेहरा
जमल्यास यापुढेही ठेव भविष्यावर विश्वास
जांघेतलं दुखणं
प्रेषितालाही होतं असं अवघड
दिशाहीन, आसक्त
अफूच्या बोंडासारखं बहकलेलं
तू जे समजते आहेस
ते आहे माझंच एक निर्वासित रूप
तू मला काय देऊ शकतेस
या दिगंबर हिंसाचारापेक्षा अधिक
वार करतेच आहेस
आता अहिंसेची काळजी कशाला ?
आता आपल्याच भुताला
करू दे
आपल्याशीच द्रोह

छान झालं
आपण आपली वस्त्रं उतरवली
आणि एकमेकांना मिठी घातली ते
हे असं अचानक
आपण कसे परतलो अंतिम श्रेयसाकडे
नदीचं मूळ आणि ऋषीचं कूळ शोधू नये म्हणतात
नेमके आपण कसे परतलो उगमाकडे
जिथे काहीकाहीसुद्धा नाही हे
तू मी आपण सर्व
दिवस महिने ऋतू आणि वर्षं
आपली नग्न शरीरं
त्यांचा द्वैतार्थ

आपण झालो आहोत ज्ञान आणि अनुकंपेचा विषय
आणि ही अशी निखळून पडतात जखमांची तावदानं
स्वच्छ, भरपूर उजेड भिनू लागतो मस्तकात
नववधूगत मंथरलेली माती,
मृद्‌गंध पसरू लागतो गात्रागात्रात
आता कोण छिनावून घेणार आपल्यापासून
हा समुद्र
हे आभाळ
आत्मा आणि शरीर वेताळपंचविशीतल्या गोष्टी
या स्त्रैणपणात आपण आपला जपायचा मुखडा
जरी तुटली असेल बुटाची लेस
तरी चढू आपण सुतानं स्वर्ग
फक्त केसानं गळा कापायचा नाही
आपण एकमेकांचा

या आंतरिक घटनांचा कर्ता
क्षण प्रतिक्षण हे असं पापाच्या दिशेनं जाणं
काट्यांची शय्या, निर्दयी सौंदर्य
नफ्यातोट्याच्या प्रेरणा
मुक्तीचा प्रयत्न
कालचक्राची गती
क्षितिजाच्या चेहऱ्यावर झालेली जखम
त्यानंतरची
व्याकुळ हृदयातली क्षणभंगुरता
अभिन्न अपार नवरसाचा समुद्र
खरंतर
तुझ्या देहाची प्रशंसा करायची माझी क्षमताच
संपलीय
तुझ्या नजाकतीचा फुरफुरणारा घोडा
घे हे कठपुतळे
या स्नेहापोटी कसलं उत्थान मांडलंयस

मरणासन्न दशेत उपेक्षेला प्रारंभ झाला आहे
तू कुणाच्या विरहात अश्रू ढाळतेयस ?
नशिबाचा अत्याचार
तू आजवर कुठल्या कल्पनेत होतीस तल्लीन
या प्राणावर फुंकर घालून
ही विषबाधा थोडीच थांबेल !

मुद्रणसुलभ अस्तित्वापेक्षाही
तू आहेस याहून अजून काही
त्याला व्यापून टाकणं
हे असं राहूनच जातं हरघडीं
रतिबंधातला आदिसंबंध
आपण शोधत रहायचं
आपल्यातलंच सत्य
आणि आपल्यातलंच सौंदर्य
विवक्षितपणाच्या पलिकडे
परिकल्पनांचा प्रहर
त्यात अंतहीन प्रेमाच्या गोष्टी
कंच्या निरंतराला सांगाव्यात ?
गहन आणि गूढ यांच्या पलिकडेही असतो
माणूस
एक प्रलंयकारी आच
या निच्छलात आपणच आपणाला
शोधून काढायचं
यासारखं दुसरं सुख नाही

गत रात्रीतलं
वेदनेचं झाड
तुझ्याशी बोलू इच्छितंय
आणि तू तर चक्क
कपडेच उतरवायला लागलीयस
आता कठिणच आहे सगळं
दांतेच्या नरकासारखं

ओठांवर गाणं
गाणं उभ्या आयुष्याचं
जन्म
मृत्यू
समांतर खेळ
हे आभाळ
असंच समांतर
खरडत रहाणार जमिनीला
हातापोटाची गाठ
तराजूत घालून
तू पाण्याचं हृदय तोलू नको
कवी
कवीचं काय घेऊन बसलेयस
ते पहुडलेले असतात
शरपंजरी स्थितप्रज्ञ भीष्माचार्यासारखे
ज्यांना आपल्या नाकावरलीही माशी
हाकलता येत नाही पाहिजे तेव्हा
तू तुझं गाणं
या दर्पणात बंदिस्त करू नकोस

रात्रीचा भ्रमर
वनचरांचा नि:श्वास
या शांत बगिच्यात मी झालोय बोलणारं झाड
लदवदून टाकलंय मला डोळे आणि हिर्व्या जर्द पानांनी
अफवा मारतायत भविष्याच्या चेहऱ्यावर थपडा
प्रतिमा लागतात कोसळू
तुम्ही कोणावर विश्वास ठेवणार ?
माणसांवर की जनावरांवर ?
आकृतिबंधाचा ताप
अंतर्बाह्य घटनांची कल्हई
सर्व सत्यच मोराच्या पंखासारखं थरथरणारं, कातर
तुम्ही सत्याला कपडे चढवणार काय ?

आकारापासून अग्नीपर्यंत
संगीत शुष्क लाकडातलं आणि धातूतलंही
वाऱ्या-पाण्यावर कोरली जाणारी नक्षी
त्यानंतर दिगंतर भोगास येणारा
मध्यरात्रीतला दाहक चंद्र
सार्वजनिकांचा छन्नमार्ग
त्यावर कशाला हवाय एकट्यादुकट्याचा अधिकार
तू निढाळ चेहऱ्यावरलं निस्तेज आवरण
कसल्या खांबावर केलंयस उभं अस्तित्व ?
तुझ्या हवेचं दार उघडं असू दे
सृजनासाठी
ते येतंय, येणारच, फक्त प्रतीक्षा हवी
जमल्यास अव्यभिचारी
न जमल्यास व्यभिचारीही...

शाश्वताचा घंटानाद, तू हळूच खेळ, खेळ.
तू एक निर्झरणी, तू नाहीस बाहुली
तू एक गाणाऱ्या नदीचं रोमांचित पाणी
आता हे अभंगस्नान आत्म्याला
तू जिथे आहेस, तिथे पोहचतं माझं हृद्गत
हा माझा दरभंग्याचा मार्ग पोहचतो तुझ्यापर्यंत
आणि माझ्या देहाचं सूर्यफूल चालू लागतं तुझ्या दिशेनं
दगडांच्या भरवश्यांवर नशीब जोखणारे
ते सर्व दिशांतून करू इच्छितात विषारी बाणांचा वर्षाव
ते शिकारीला हपापलेले
त्यांच्या सदिच्छेच्या घराला आता दारंच उरली नाहीत
या अंधारापेक्षा गडद आहे तुझं प्रेम
या रजोनिवृत्तीपेक्षा मला जवळचा आहे हा सूर्यास्त
या खोल दीर्घ तासातून नांगरून जाते अवघी भूमी
गव्हाचं हिरवंशार पातं पुन्हा बोलू लागतं वाऱ्याशी
खरंच
आहे त्या रूपातच
हे खनिजाचं निवडुंग सुंदर दिसतं आहे

पाण्यात गळून पडते कात आत्म्याची
पुन्हा वेल चढू लागते त्वचेवर
कृत्रिम ग्रीष्मात जळू लागणारं तृष्णेचं झाड
या पलिकडे आहेत तुझे दर्यावदी डोळे आणि त्यांमधली वीज
कुठूनसा तुझ्या अनुपस्थितीत मिळतो इशारा
आणि समुद्र चालत येतो किनाऱ्याकडे
यौवनाचं फुलपाखरू नग्नतेच्या बेंबीवर विहरणारं
तुझ्या स्तनांची शुभ्र गोगलगाय सर्पटत रहाते शरीरातून
पायाशिवाय चालतं पाणी
असा हृदयात पाऊस खेळू लागतो
कितीतरी दिवसांनी सुरू होते कामाग्नीची रासक्रीडा
प्रत्येक वस्तूचं उघडतं अंतरंग
वाद्यवृंदाच्या तालावर देवदारूंची वत्सरं नाचू लागतात
स्वप्नांच्या दारावर टकटक
हे सहचारिणी
इच्छांची गुलाबी हरणं
चुंबनांची जास्वंदी फुलपाखरं
सूर्याचं विभोर तळपतं नाणं
हे अस्सं प्रेमाचं छिद्र येथपर्यंत कस्सं आलं
जखमी कुतरं घोटाळत रहातं पायांत
या शुभनिद्रेची मुळं तर दुखावणार नाहीत ना ?

तुझ्या स्वातंत्र्याकरता माझे हे हात आहेत
तुझं वक्ष:स्थळ विश्व माझं
स्वर्गाच्या शय्येवर उगवतीचा देह
द्राक्षांचा हंगाम
सुख आहे काय आपल्यापासून दूर ?
आनंदाचं मेंढरू
चुंबनांची धर्मशाळा
तुझ्या विस्तारित मांड्यांचं लावण्य

एका दिवशी
या मुली वळतील स्वप्नांकडे, खऱ्याखुऱ्या कवितांकडे
माझ्यासारखा फाटका मवाली कवी होईल त्यांचं संकेतस्थळ
खरंच या मुलींना आवडतं म्हणून मी लिहितो
त्यांच्या अंतरात्म्याचं फूल हुंगणारं कवितेचं फुलपाखरू
लाँग लिव्ह फ्रीडम
या शहराच्या सुरक्षिततेसाठी मी गात नाही हे
या पोरींना जिंकून घेण्यासाठी मी गातो आहे
जोपर्यंत मी गात राहीन तोपर्यंत हे दिवे जळत रहातील
ऑगस्टमध्ये प्रेम जन्माला येतं, त्याचं हे असं फुलपाखरू होतं

शिव - शक्ती
कलगी - तुरा
स्त्री - पुरुष
वेणूमधली बानू
धनगराचा परिवेश
हा दैत्य अश्वांच्या टापांखाली तुडवला जाणारा
ही सांद्र संतुर उभ्या आयुष्यात हवीहवीशी वाटणारी
मैथुनाच्या मंथनातलं हलाहल
या अनुभवास आता शब्द नाहीत
ही अभिव्यक्तीची माध्यमं अशी दुबळी ठरलेली
कोण, कोण
थांबवणार हे सर्व ?
हे मैथुनाच्या देवा
या जांभळ्या रंगाच्या ज्वाळा अंगांगाला लपेटून
कोण करतं आहे नर्तन ?
मेंदूतलं चक्री वादळ
मनातला ज्वालामुखी
शरीराचा भूकंप
रक्तातला प्रलय

हे दाहीदिशा उधळलेले दिगंतरी अश्व
हे कालिंदीचं पेटलेलं श्यामवर्णी पाणी
हा सर्वमर्दनाचा कर्दनकाळ चक्रधर
हा सर्वस्वाचा ठाव घेणारा पावा
हा मुकुंद ही राधा
ही बाधा जन्मोजन्मी जपली जाणारी
हे अपसमजुतीचं वारं अस्तित्वाला डागण्या देणारं
तुझ्या बंद दरवाज्यानंतरही माझा सहभाग
हे गोकुळ, हे वृंदावन
पिढ्यापिढ्यांची साखळी
हे मुकुटातलं मोरपीस
जन्मणारं मूल फोडतं आहे टाहो
मरणारं म्हातारं थुंकतं आहे खाकरा
मनुष्यदेहाची जडजंबाल संस्कृती
सवतीची नवती परंपरा
आपल्याच मुळांना खाजवून तू जागृतीत आणू नकोस
अवलंबाचा ओळंबा
उशिरानंतरची कुशी
भुकेच्या पोटी फुलणारं स्मिताचं डाळिंब
समाधिकाळातलं भारलेलं झाड
फुलं, फुलांचा चेहरा आकाशाला गिळणारा
हवेच्या श्वासातून स्रवणारा संगीताचा बाज
हे स्थिरतेचं चित्र भाषेविना
हे वंगण केल्याशिवायचं हृदय

संवेदना संवेदना म्हंजे तरी काय ?
चालणारा अस्तो दुय्यम
रस्त्याचाच त्याच्यावर नसेल भरोसा
तर सर्व मथुराच पाण्यात
जमिनीच्या अंतरात्म्याला कुणी चिरील काय ?
हवेच्या पोताला कुणी धरील काय ?
इथे आजूबाजूला मुक्तीची फळं विखुरलेली
आपली धडाडती हृदयं बंद करून
आपण काय वेचणार आहोत ?
मैलांचे दगड की दयेच्या फांद्या
की जन्मोजन्मी जखडून टाकणाऱ्या शृंखला ?

विहारातली तळी
प्रवासातले पोषाख
स्वारीमधले घोडे
युद्धातले योद्धे
तोफांतले गोळे
हा निकालाचा प्रतिबंध
आपण करायचं वर्तुळ आपल्याभोवती
इतिहासाचा भोवरा आपणच फिरवायचा
जाळीवर हुकूम
टाळ टिपऱ्या
मृदुंग पैंजण
बासरी
आकृत्यांत मिसळल्या जाणाऱ्या आकृत्या
वसनं आणि आसनं
बैठका नि गट्टीफुगडी
रुसणं नि फुगणं
चुंबणं नि रुमझुमणं
हा चंद्रदंश शुद्धतेचा
स्वर्गाच्या पोटातलं गुपित हें अस्सं सांडून टाकायचं
अस्पृश्यतेच्या वाटा ह्या अशा पुसून टाकायच्या
Time & Space
दिक् आणि काळ
हा काळभैरव षड्रिपूंचा
हे मैथुनमोरा, ह्या जखमांवर फुंकर घाल

तू एक व्हीनस किंवा नुसतीच
एकुलती एक जिवलग बाई
माझ्या स्वप्नवास्तवातली,
किती एक वर्षांनंतर कितीएक
खडतरफडतरांचे दुर्लभ ओलांडून
भ्रमविभ्रमांनंतर बि-घड
खरंच आम्मी बिघडलो
तुम्ही बि-घडा

वेडा खातो पेढा
पागल सबसे आगल
मी कशी पास होऊ ही सत्त्वपरीक्षा
देव । पशू यांच्या पलीकडे जाऊन
मी हाकारतोय माझ्या एकुलत्या एक कुरूपतेला
अंतरंगात उठलेल्या दुःखाबद्दल कशी करू तक्रार
हरवलेल्या अनाथ निर्हेतूकरताचीच तोशीश
हा सूर्यसंज्ञेचा वहुगामी विटाळ
मी गुदमरत चाललोय एका अनाम भुकेनं
मी खेचला जातोय एका अनाम ओढीनं
आयुष्याचे नवे अर्थ नव्या श्रद्धा
ढकलताहेत माझी हतबल गाडी
होते आहे रक्तात वृक्षवल्लरीची फंदफितुरी
स्वर्ग । नरक

यातनांचा हलकल्लोळ
यातनांची अंदाधुंद
हे मुजोरातल्या दुजोर सज्जन पोरी
ही तुझ्या पिवळ्या लावण्याची सूर्यफुलं
करू शकतील काय माझ्या हृदयाचा इलाज
मी माझ्या सर्वच इंद्रियांना सावरून
साद घालतोय तुझ्या-माझ्या आदिरूपातल्या
सुकुमार स्वप्नांना
संवेदना देतेय युनिक रंगविभ्रमांना गहनता
मी । तू । आपण व्याकुळ कोयल
किंवा मिठु मिठु पोपट किंवा सारसवागेतील
झुलतं बेफाम दारूकाम
ओ, माय लव्ह
ओ, माय हार्ट
डोंट बी सिली
डोंट हर्ट मी
जसे अलगद डसतात ऋतू विश्वंभरावर
तसं तुझं नाव अलगद माझ्या ओठावर

यातनांचा हलकल्लोळ
यातनांची अंदाधुंद
हे मुजोरातल्या दुजोर सज्जन पोरी
ही तुझ्या पिवळ्या लावण्याची सूर्यफुलं
करू शकतील काय माझ्या हृदयाचा इलाज
मी माझ्या सर्वच इंद्रियांना सावरून
साद घालतोय तुझ्या-माझ्या आदिरूपातल्या
सुकुमार स्वप्नांना
संवेदना देतेय युनिक रंगविभ्रमांना गहनता
मी । तू । आपण व्याकुळ कोयल
किंवा मिठु मिठु पोपट किंवा सारसवागेतील
झुलतं बेफाम दारूकाम
ओ, माय लव्ह
ओ, माय हार्ट
डोंट बी सिली
डोंट हर्ट मी
जसे अलगद डसतात ऋतू विश्वंभरावर
तसं तुझं नाव अलगद माझ्या ओठावर

हे ओलांडून लिंगाचं आखात
हा टाळून लिंगघोष
ही ब्रेसिअर
हा पेटीकोट
ही निकर
वैषयिकतेला डावलून
घडते आहे आकस्मिक द्राक्षमोड
ही हुरहुर
ही खोल हृदयस्थ गुंतागुंत
काहीतरी आतून आतून खोल आतून
काहीतरी रुततंय काहीतरी तुटतंय
हा ताण । तणाव
ही जखम । ही वेदना
ही लिलीची फुलं
हे गुलाबपाणी
ही काटेटोचणी
ही गडातपणाची वरात
कोण करतं प्रहार, कोण करतं प्रत्याघात
घाव । ढलपी । जखम । रक्त । सिंफनी
झुळझुळु कोसळणं वहाणं
हा तुझ्यातला सुलभतेचा डोळयांत भरणारा
लखख उजेड
कोटी कोटी सूर्यांची संग्रहित दाहकता
ज्यात अभिजात प्रीतीचा पतंग भरदोर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०७ / २३९७५
काव्य ३।३।८२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

हे माझ्या जीवश्चकंठश्च कबुतरा
कुठं आणि कसं सांधू माझं शतविदीर्ण हृदय ?
ह्या रूढ संकेतांच्या रासमुद्रा
कुणी श्याम
कुणी अनयाची राधा
ही अंटेना माथ्यावरली
ही वेव्ह लेंग्थ कोटी कोटी हृदयांतली
ही गुपितं
ही किलबिल
ही धुळीतून विखुरती शीळ
हा पंखांना लगडणारा मातीचा मदोन्मत्त गंध
कित्येक जन्म आपण ओळखतो आहोत काय
एकमेकांना
की एकमेकच ओळखतो आहोत कित्येक जन्मांना
माझ्यातल्या शुभंकराला स्पर्शणाऱ्या शुभदे
हे अवघ्या आनंदाचं कारंजं
थेंब
थेंब
थेंबांची होत जाते ठिणगी
उभारतं साक्षात कुदरती जालिम लावण्य
लावण्यांतून विघडत-उघडत जातं सहज
तुझं मखमली तारुण्य

हे माझ्या एकुलत्या एक सालस सुंदर
पोरी,
तू ये या आदिबंधातून बाहेर
तू ये तुझ्याच स्पॉटलाईटमधून अलिकडे
ही वर्षानुवर्षांची आसुसी
तू होऊन जा अवघ्या आनंदाचं निधान
कित्येक युगानुगांच्या आत्महत्या
जाऊ देत एकदाच्या टळून
परावर्तित पारदर्शक होऊन जाऊ देत ही सर्व
रहस्यं । आयुष्यं । वयं । वर्षं
धारणेला मिळून जाऊ दे निर्मितीची ताकद
पहाता पहाता
अवतरू दे
व्हॅन गॉगची ख्रिस्तीन
ही तलम वस्त्रं लज्जेची टाक उतरून
तूही झालीयस माझ्यातल्या व्हॅन गॉगचं दुःख
ज्याच्या नग्न मांड्यांत अव्याहत निवरपणा
ज्यात सकाळेच्या स्तनांना फुडणारा पोरका पान्हा वत्सलतेचा
ही निळीशार तृष्णा
ही छळनिद्रा
ही मुद्रा आरपार दुःखाची सवासण
हे उघडीप फुलांचे लडिवाळ
हे अंतरपुच्छ हे अंतरगुच्छ
ही समाधीची कर्पूरहोळी

ही ऊब परिपक्वतेची
ही पहाट निःश्वासांची
ही ज्ञानेश्वरांची ताटी, तुझ्या विभोर केसांची
वाटल्यास भूतभविष्यातलं शब्दांचं वादळ
भासातून आभासाची सूक्ष्म कुदळ
तुझा
इथे
अवतीभोवती वावर माझ्या
लपाछपी । छपालपी
ही विसाव्या शतकातून वाहणारी
नागमोडी शानदार नदी
हे दर्शनी वितरण मोरांच्या पिसाऱ्याचं
ही तल्लख मंथर रक्तातली
हे संगमरवरी चांदणं आणाभाकांतलं
ही युगांची भुतं भटकताहेत सैरावैरा
हे संगमाचं पाणी येतं आहे अंगावर धावून
कशी खेळली जातेय झिम्मा फुगडी फुगडी
ही परंपरेची लंगडी गाय दावं तोडणारी
सकाळी उठलं की मन्याचे श्लोक
रात्री बसलं की शुभंकरोती दारु-डे
दगडी नशिबाच्या पुढ्यातील समया
तू फुलव तुझ्यातील मूलभूत ज्योतीला
होऊ दे तिचा लडिवाळ स्फोट
हा दिक् आणि काळ

हा काळभैरव
चालव, चालव, तुझ्या नजरेची रंगदार सुरी
हा आभाळाचा पूर्वदूषित कॅनव्हास
खेळ अमूर्ताचं भंजन
सरा । लोत्रेक । गोगाँ
आणि अजून कुणीतरी अरुण काल
किंवा माझा एकुलता विसावा व्हॅन गॉग
आता उधळू आली
अस्तित्वाची रंगपंचमी
पॉप आर्ट किंवा सरोजिनी सुरियालिस्टांची
चल
चल
चल लस टोचू वेडाची
वेडावू जग हे सारे
वेडावुन पाहणाऱ्या
वेडावेल जग सारे
भर - जग
जगभर पाणी
दारिद्रय । शक्ती
काळे । गोरे
स्पृश्य । अस्पृश्य
हा भिडूंचा गडू हिंदकळता
ध्वनी आणि मधुर हवा

हा परपीडेचा प्रकाश
हा आपपीडेचा अंधार
या हीनयानातून महायान
हे हर्ट होणं
हे आंधळ्यांच्या परमेश्वरा
हे डोळसांच्या सैताना
हे दु:खितांच्या येशू
हे भाऊ पाध्याच्या वासू
हा गवताक्षी दर्द बहार
हा जिरेटोप वेदनेचा माथ्यावर
हे श्वासागणिक हलणारं हिरवं पान
होऊ दे स्पर्श एक दुसऱ्याला
आरपार आदिरूप
पुन्हा काळजांचे ठोके
पुन्हा धडपड हृदयाची
किंवा कतलेआम
नाहीतर तू आहेसच
उघड, उघड ना दार
सगळीच दारं कशी बंद
हा विरहाचा एकतर्फी चंदन
भाजून काढतोय व्यभिचाराचं अंग
पातिव्रत्य होतंय सुजाण
व्याली जातेय विन्मुखता

प्रेमाची लेन्स
प्रेमाचं बलून
डेड हॉर्स रटाळ कॉफी हाऊस
गळतीची पानं हजार
निद्रानाशाचा विस्तव
जाळून काढतो आहे माझी निखिल रात्र
ये जवळ ये
या वाहत्या पाण्याला मिठीत घे
हा अलवार घोडा
उधळतीचा
टचकन उमलून आलीच आहेस
डोळ्यांत अगोदर
तर आता थांबवू नकोस
सावरतीचा पदर
नको कारणीभूत निमित्ताला
मी नाकारले आहेत मध्यस्थीतले सर्वच
खलनायक
उधळून टाकल्यात त्यांच्या-माझ्यातल्या स्पर्धा
मी घेतो आहे अस्तित्वाचं उडतं चुंबन
ज्यात सामावलेलं
भूतभविष्यवर्तमानाचं नादब्रह्म ओतप्रोत
तू ये, ये
ये
तुझे पंख विस्फारून

ये व माझा स्वीकार कर
सात घटकेचा मुहूर्त
आधीव्याधीनंतर
सर्वांगसुन्दर प्रतिमासृष्टी
अश्विनीरूप ऋतुस्नात कामातुर लक्ष्मी
सर्पस्वरूप विष्णू उर्ध्वरेत स्खलित
सूर्याचे अनुष्ठान
हे शेष सूर्याच्या चेहऱ्या
हे कामेच्छेच्या माते
हे अदिती
माझ्या प्रियेचा दगड
मला अधिकच प्रिय आहे

४ वेद १८ पुराणं ६ शास्त्रं
मी मारतो लंडावर
६ राग ३६ रागिण्या मी खेळवतो उरावर
छान, या सुभगवेळी
तू संभोगेच्छा प्रदर्शित करतेस ?
स्त्रीची कामेच्छा पुरी न करणं,
कवी असल्यामुळे, मी समजतो पाप

पानंफुलं झिम्माफुगडी खेळतायत
कोकिळा गातायत राजहंस गातायत
खरंच ग, तुझ्या अरण्यानं नवीन रंग धारण केलाय

द्वैत भावातल्या शुभाशुभाची सावली
जिथे नजर टाकतो तिथे अथांग शृंगार
अस्तित्वाच्या दर्पणात तुझा कैफ उभा
विस्ताराचे संदर्भ, नश्वर अनवरत जलधार
अराजकता, निरर्थकता
सरळ सोप्या प्रतिमांतून रूप घेणारं तुझं लावण्य
सत्याच्या अंतहीन रेषेला स्पर्श करणारा
आकाशानंतरचा विलुप्त स्वर्ग
अप्राप्य प्रेमाच्या गोष्टीअगोदरचा क्षुद्र दैनिक मृत्यू
ध्वनी वळणानंतर होत जातो पुष्कळ
नेपथ्याच्या जागी फेकलं जातं द्रवरूप
तीन वृक्षांच्या तीन तऱ्हा
कालोदयाबरोबरची चकोर वाढ
चंद्रकिरणांचं नृत्य
चंद्रकोरीवरली धूळ चोच मारून एक चिमणी झटकते आहे
हिरवळीच्या चादरीत दवबिंदूंचा चेहरा लपलेला
सहस्रमुखांनी
हे सर्व पूर्वसमुद्राला मिळण्यापूर्वी
या निःशेष सम्राज्यात मला माझ्या
अभिशप्त एकांतापर्यंत जाऊ दे
मी भ्रमणयात्री
या शहरातलं हे हवेचं तळं
तळ्यामधल्या न्हात्याधुत्या पोरी
खडतराची तुळई आणि उशी

गवत ढग आणि पाण्याचा विभ्रम
हिर्वा आशीर्वाद घेऊन माझा आत्मा निघाला आहे भ्रमणाला
दुपारी
जनावरांसारखं रवंथ करणं कदाचित नसावं त्याच्या
अंगवळणी
तुझी मर्जी ठेव उजेडावर
उजेड म्हंजे ज्याला मी म्हणतात
नाहीतर कोसळून जातील विद्यापीठातले बुद्धिजन्य वारस

आता काहीच हरवण्यासारखं उरलं नाही
आता काहीच मिळण्यासारखं राहिलं नाही
'मारा'चा पाऊस सहन करणारी नुसती एक सशक्त पोकळी
आणि कुणाचीही भिंत चोरून अंगावर चालत येणारा ज्ञानेश्वर
कल्पनेचा महारोग
बेंबी । मेंदू । फुप्फुस यांतून
या सर्व रोगलागणीनंतरही
ही ज्ञानपीठं आनुवंशिक, त्यांच्या अंतरंगातून
झुलती घरं इच्छांची
ही बैठकीच्या जागेतली शापितं आणि गुपितं
भाषेचं वस्त्र भाषेचा साज भाषेचा रोग आणि
भाषेचा हातमाग
आठवणी बालपणाच्या आणि परिपक्वतेच्या
चालतो परंतु अंतर कापलं जात नाही
ही खोड जडतरातली

बिछान्याचं पातं
बिछान्याचे आयने
शाईच्या पंखातून प्रसवणारं समृद्धीचं नागरिकत्व
भविष्य होऊन जातं डोळ्यांतलं गढूळ पाणी
कल्पनेच्या पंज्यात सापडतो निराशयाचा उंदीर
सार्वजनिक जागांचं गावठी माहात्म्य उठतं पेटून
लक्षवेधी सूचनेनुसार
निःश्वास लागतो पिकू
दृष्टिक्षेप होतो प्रस्थापित

वर्षं, वर्षांमागून वर्षं
परतू शकत नाहीत मूळ जागी
कितीतरी गमावलं
कितीतरी कमावलं
वेळ करू शकत नाही सहाय्य
तू एक दुखरा क्षण ठेव माझ्यासाठी जपून
मी तुझ्यातून
फाटक्या भणंगासारखा निघून जाणार नाही
मुंबई, मुंबई
माझ्या प्रिय रांडे
मी तुला नागवून जाईन

कालचक्राची विलोभनीय रूपं
'नशीब' नावाचा दरोडेखोर त्यांवर प्रहार करणारा

" चार आनेकी मुर्गी
बारा आनेका मसाला"
शतकांच्या जखमांवर किती मलम चोळायचं ?
सुळावरल्या पोळचा किती उपसायच्या ?
किती ठेवायचे आठवणीत दगड ?
प्रत्येक ठेचेत एक एक मृत्यू सहज आणि रगड
या भूमिगतपणातून व्हायचं असं प्रगट
मर्मात आवाज भिडू द्यायचा आकाशाला
समुद्राचा खवळता
वीज आणि ज्वालामुखी
ढगाची छत्री या समुद्रनवरीच्या माथ्यावर
वऱ्हाडी, करवल्या आणि करवले
ही वरात अशीच वाजत गाजत चाललेली
धुळीच्या चेहऱ्याला जखमी करणारा घोड्याचा नाल
ही मायावी पृथ्वी करू शकणार नाही आपलं कल्याण
पोटभर घालणार नाही जेवू खावू
पाशवी थैमानांचं आंधळेपण
आंधळा न्याय तीक्ष्ण नख्यांचा
या अगाध गहनतेत पेरलेलं दु:ख माझं
हे स्रोतफूल अनुपातातलं लोकोत्तर
सुलभत्या वैभवाचा होतो असा गर्भपात
भूतभविष्याच्या डोहात जाऊ दे मला बुडून
हजारो वर्षांपासून ही पाखरं कैदेत तडफडणारी
माणसांचा समुद्र, विशालतर बंदरं

कावळे बगळे पोहते पाणपक्षी
समुद्राची मुडप महिरप घडपडघडीची
काठ्या डोलकाठ्या उभारती शिडं आव्हानांची
सिंदबादच्या सफरी
नानाविध रूपं समुद्रखेळाची
सूर्य असा गुंजेसारखा होऊन जातो गडीगप्प पाण्यात
क्षितिजाच्या पलिकडे त्याला असं शोधायला निघायचं
आपल्याच रक्ताचे नि:स्पंद भोग असे राजरोस जागवायचे
दळणवळणाचे जाळे
ट्रेन, बसेस, डिलिव्हरी व्हॅन्स
सात लाख वाहनांनी प्रदूषित काळीकभिन्न झालेली तू
ओंजळभर पाण्यात आपण जीव द्यायचा काय ?
हे असं नाकातोंडात पाणी
ही अशी नाकबंदी

घ्या सुय्या पोत बिबं
बाये
हायका
डबा बाटली
कागद कपटा
हेपटचावर हेपटा
ही मुंबई खरंच कोणाला उपाशी निजू देणार नाही
ही मुंबई खरंच कोणाला उपाशी मरू देणार नाही

कंच्या भूगर्भातील पुरुषार्थाशी ही रात्र
संग करू पहातेय ?
सीमांत, देहांत
या गिरण्यांची बटनं
कोण ऑन करतात ?
दुर्दम्य स्पर्शाचं रोरावणं
संकीर्ण वेदनांचा परावश चित्कार
या बीजांना कोणाच्या आज्ञेवरून अंकुर फुटतात
संप मोर्चे निदर्शनं घेराओ
जमल्यास लुटुपुटूचा लाँग मार्च
जीवनातल्या विषाचा विलंब
सुखदु:खाचा तोळामासा
ना आत ना बाहेर
स्वच्छ निळयात, सताड चंद्र उभा
रोशनीची उन्नत लहर, नि:स्तब्धता
जागोजागी क्षार हरवलेल्या अदृश्य गंधाच्या लाटा
माझ्याच ओढाळ देहाचा तू एक अवयव
माझ्याच रात्रीचा तू एक विभाग
मी वेडा आहे तुझ्यासाठी
छप्पर फाडून तू खाली ये
जोपर्यंत रोपित करत नाहीस तुझं अभिजात प्रेम
मी भुकेला आहे तहानलेला आहे आणि निद्रानाशानं त्रस्तसुद्धा
मी मागतो आहे भीक खणानारळाची
धुतले तांदुळ आणि तांदुळज्याची भाजी

एक दुसऱ्याला स्पर्श करणारी आपली हृदयं
आजपर्यंत मी ठेवला नसेल तुझ्यावर विश्वास
आलो नसेन तुझ्या ढाबळीत
चाटल्या नसतील जिभेनं अंतरंगातल्या जखमा
तुझा उदय होतो आहे
उद्या काहीही वाढून ठेवलेलं असू दे ताटात
मीही असा पोस मागायचं सोडून
धेडगा नाचवीन
भुईनळाची झाडं, हवाई डब्या आणि ॲटम
सनईसूर ताशा आणि लेझीमची घाई
रात्रंदिवस तुझ्याच इच्छेची विभिन्न रूपं
ही आत्मारामाची कंपनी
तिच्यात सर्वंच कसं होत रहातं ठणठणपाळ
हरहुन्नरी संदेश जाऊ दे घरोघर
भिकेवरल्या हाकेची निर्लज्ज दारं जाऊ देत कोसळून
उभारली जाऊ देत गुढचा तोरणं
होऊ दे एकदाचं सीमोल्लंघन
हे सूर गोंधळात टाकणारे
ही वेळ आकाशाला चावणारी
अग्निवृक्षाचं कारंजं
चमकणाऱ्या प्रपातात उडी घेणाऱ्या धबधब्या
तू माझ्या पकडीतून निसट आणि चालू लाग
तू जाऊ शकत नाहीस कुठेही
तू राहू शकत नाहीस कुठेही

वर्तमानाला होऊ दे पायाचा स्पर्श
पावसात गंजून गेलेलं लोखंड
बाजाराचा भंगार आणि जथ्था
कुत्र्याचे रेशमी डोळे, जीवनाच्या
धारणेला संचलित करणारे
सूर्याची कॉइल पहाते आहे उडू
झावळतीच्या तारखा
या म्हणीच्या मध्यावरला
मी आशीष
मला रस्त्याचे क्रॉस चालत नाहीत
दगड चिरडला जातोय
माणूस चिरडला जातोय
होतेय सर्वस्वाची खडी खडी
पाडली जातेय खडी
फोडली जातेय खडी
हवेतले तुटते मनोरे
दऱ्यांचे ओठ रक्तबंबाळ होणारे
प्रस्फोटित होणाऱ्या मूलभूत कल्पना
गिलोटिनची इंद्रियं
छातीच्या स्लाइस
बेंबीची भाकरी
वक्ष:स्थळाची दारू
हवेची मुलगी डोळ्यांत नाचरी
कुत्र्याच्या डोळ्यांतला काकुळतीचा घननिळा

लाल पिवळा हिर्वा सर
किती मजेचा
धडाधडीची इमारत
जीवशास्त्राच्या पानावरली हालचाल
बीजकोषांना काढलं जातंय सोलून
घातलं जातंय जखमांना खतपाणी
पिकू लागते भुवई
शांततेचं मोडून पडतं तंगडं, मुळं दुखावतात
अवकाशात ऋतू राहतात जळत
कारागृहाच्या, गजाआड जळतात मेणबत्या
दगड उगवू लागतात आत
हवेची तीक्ष्ण चोच खुपसली जाते
बाईच्या अंगात
टांगलं जातं वळचणीला पाणी
बीजकोष गातात साती आसऱ्यांचं गाणं
निदर्शनं करून झोपलेलं पाणी
होऊन जातं लेकुरवाळं
दृष्टीचं यंत्र
सुसंवादाचा फ्लास्क
या जडशीळ प्रकाशापेक्षा
हलकं आहे तुझ्या कामांगाचं वजन
माझ्या देहाच्या पेटीत
हे कसले क्षण बंद करून ठेवलेयस ?
अवकाशाची कशी करायची घडी ?

कशी
नांदवायची ज्योत त्रिभुवनांची ?

हीनदीन पूर्वीपासूनच्याच सुरुवाती । समाप्ती
वयाशिवाय वाहणारा वारा
धूळ प्रकाश ध्वनी यांचा कारखाना
संभ्रमात टाकणारे रंगनंग
आंधळेपणाचं दगडी गाढव
व्यापारी खेळवतात अस्वलं
घणाघात सर्व आर्थिक नसनाड्यांवर
फिरला जातोय शुभ्रतेवर पोचीरा
कटऱ्यानं पुसले जातात मुलाबाळांचे आक्रोश
राजवंशातले कावळे वाहून आणले जातात कासवाच्या पाठीवर
अरे कुणीतरी बघा
या मुलांचे कपडे फाटलेयत
अरे कुणीतरी बघा
या मुलांची नखं वाढलीयत
सुस्वरांची दारं आणि प्रार्थनांचे गुडदे
खरीखुरी शीळ
कारंज्याच्या स्पर्शानं भिजून जाणारी
माझा अहंकार जातो आहे तुटून
मी तिचा हात पकडू इच्छितो
मी तिचा सहचारी होऊन चालू इच्छितो
आज २९ ऑगस्ट

संपत आलेल्या पावसाच्या गोष्टी
कोसळल्याच तर अजूनही एकदोन सरी कोसळतील
आजही
ओल्या पंखावरली ओलीचिंब नक्षी घेऊन पक्ष्यांचे कळप
लहरा घेतील आजही,
एखादया बगिच्यात प्रेमाच्या नांवाखाली जोडपी
सांडतील सालंकृत धातू आजही
लालजर्द स्कॉच
रत्नजडिताचं झाड
छान
या दिवसाचं नामकरण करतेयस तू

अमानुषतेचं पाणी
तू माझा विहंग
वस्त्रं आणि अंग
या इच्छांना भर्जरी कपडे नेसवू नकोस
फॉस्फरसातून तय्यार होणारी माणसं
सुईचं घड्याळ, खांद्याला स्पर्श करणारं,
या सर्वांना आग लागली तर तुझीही वाफ होऊन जाईल
हे खऱ्याखुऱ्या मुली
हे शृंगारिक लावण्यांमधल्या चंद्रावळी
या चतकोर सूर्याचा हट्ट सोड
पिवळं वादळ पंखांना इजा करणारं
त्यात हा असा रक्ताचा मुका ढोल

मी, चिरतृष्ण, तुला बहाल करू इच्छितोय
हिरवे जादूभरे नयन
त्यांत बॅक्टेरियाचे जंतू परंपरेला डिवचतात
पहाता पहाता संस्कृती निघते मोडीत
तू तुझी सर्व हाडं उघडी करून टाक
रात्र उतरते आहे झाडावरून खाली
दफनभूमीवर उगवलं आहे हिर्वं गवत
विद्युद्दाहिनीची चोच होऊ लागली आहे रेशमी
प्रत्येक शब्दाचं घातलं जातंय शवविच्छेदन
सत्याचा लुळा पाय घालू लागला आहे घोळ
बैठकीचं उत्सुक पाणी लागलं आहे आटू
या अंधारातल्या घोड्यांच्या खिकाळ्या मी ऐकतो आहे
महाश्वेता झोपली आहे भुजांवर
तिला डिस्टर्ब नको
माझी आदिवासी छगुनी
आकाश आणि पृथ्वी
जन्म आणि मृत्यू
परमेश्वर आणि मनुष्य
उदय होतोय की अस्त
सर्व चेहरे सारखेच आहेत
सर्व नावं सारखीच आहेत

जीवनाचं वाहन थांबता थांबत नाही
संपता संपत नाही
या भरंवश्याच्या जगात
बेभरंवश्याचा महोत्सव
शहर एक दगड
किंवा नावाचा चिरेबंद
गुलाबाचं स्वातंत्र्य
कायद्याचा खेळ
वायद्याची दारू
मेंदूत पसरते आहे शाई
ग्रंथालयं होतात खुन्यांचे संदर्भ
विद्यापीठं होतायत बेडुक-लोणच्यांच्या बाटल्या

हे सूर्या
या शहराला पिऊन टाक
हे पृथ्वी, या शहराला पोटात घे
हे पाण्या
या शहराला हवेत छिनून ठार कर
मनुष्य धूळ आणि हवेतला उत्तराधिकारी
ढगांच्या थिएटरात
मीठ चिवडणारे नाकतोडे
अंतर खणलं जातंय
अनुवंशिक रोगांना जागवलं जातंय

लक्ष्मी । सरस्वती पक्षपाती रांडा
आम्ही या म्हटलों त्या आल्या नाहीत
आमच्या खाली निजा म्हटलो
त्या निजल्या नाहीत

तू आमच्याशी इनाम राख
तू आमच्या बिछान्यांना जागव
अनंताची मुरली वाजव
तू आमच्या स्वप्नांना खेळव
तू आमच्या रेतांना अंकुर फोड
हे भटकभवाने
हे अतिशूद्रे
हे खंडोबाच्या मुरळे
हे नाचनारणे
हे हमदर्दी रांडे
मी तुझ्यातून फाटक्या भणंगासारखा
निवून जाणार नाही
तुझं सत्त्व फेडून घेईन
तू अल्लखनंदाचे दरवाजे वेडझव्यांसाठी खुले कर
मुंबई मुंबई, माझ्या प्रिय रांडे
मी तुला खेळवून जाईन
मी तुला असा खिळवून जाईन

‘ प्रास ’च्या आणखी कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024145
REFBK-0024145

**Arun Kolatkar  Jejuri  3rd edition**
**भालचंद्र नेमाडे  मेलडी  दुसरी आवृत्ति**
**वसंत दत्तात्रेय गुर्जर  समुद्र**
**सतीश काळसेकर  साक्षात्**
**वसंत दत्तात्रेय गुर्जर  गांधी मला भेटला**
**सेझार व्हाय्यहो – दिलीप पुरुषोत्तम चित्रे  वहा बाय वहा**
**अरुण कोलटकर  अरुण कोलटकरच्या कविता  दुसरी आवृत्ति**

गहन आणि गूढ यांच्या पलीकडेही असतो
माणूस
एक प्रलयंकारी आच
या निच्छलाव आपणच आपणाला
शोधून काढायचं
यासारखं दुसरं सुख नाही

हे

## नामदेव ढसाळ

तुम्हांला ठाऊक नसलेले
तुमच्या ध्यानींमनीं नसलेले
तुमच्या स्वप्नींहि नसलेले—
ते कोणता

## खेळ

खेळतायत ?

मुद्रणसुलभ अस्तित्वापेक्षाही
तू आहेस याहून अजून काही
त्याला व्यापून टाकणं
हे असं राहूनच जातं हरघडी

प्रास

प्रास २२ वा

खेळ

© नामदेव ढसाळ

पहिली खेप नाताळ १९८३

मुखपृष्ठ बाळ ठाकूर
मांडणी अशोक शहाणे

मुद्रक सुरेश जगताप जनसेवा मुद्रणालय
१९२ शुक्रवार पुणें ४११ ००२

प्रकाशक अशोक शहाणे प्रास प्रकाशन
३९ नाथमाधव कांदिवली पूर्व मुंबई ४०० १०१

किंमत वीस रुपये